# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### मुंबई विभागातील शाळांच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व लाभ देय ठरविण्याबाबत

**(१) ७१६ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विभागात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात किती मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या अंतिम दिवशी सेवानिवृत्ती वेतन मंजूरी आदेश, उपदानाचा धनादेश आणि भविष्य निर्वाह निधीचा धनादेश देण्यात आला आहे,

(२) सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तांना देय असलेले सर्व लाभ देणे शक्य व्हावे म्हणूनच सेवानिवृत्ती प्रकरण दोन वर्षापूर्वीपासूनच तयार करण्यास सुरूवात करावी, तसेच सेवानिवृत्तीचे लाभ वेळीच न मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०१-२०२६) :** (१) व (२) यानुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचेकडून प्राप्त माहितीनुसार, सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात मुंबई विभागात एकूण १८२१ कर्मचारी (मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक/शिक्षक/शिक्षकेतर) सेवानिवृत्त झाले आहेत. त्यापैकी सेवानिवृत्तीच्या अंतिम दिवशी ९६१ कर्मचाऱ्यांना लाभ अदा करण्यात आले आहेत. उर्वरित प्रस्ताव शाळांकडून वेळेत सादर न होणे, तसेच त्रुटी असणे व त्रुटींची पूर्तता शाळेकडून वेळेत न होणे या कारणांमुळे सेवानिवृत्तीच्या दिवशी लाभ अदा करणे शक्य झालेले नाही.

मा.महालेखापाल कार्यालयाकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे मंजुरी आदेश प्राप्त झाल्यानंतर सदर आदेश संबंधित कोषागाराकडे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती दिनांकानंतरच सादर केले जातात. तद्नंतर संबंधित कोषागाराकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सेवानिवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम अदा केली जाते. तसेच कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतरच भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदानाची देयके संबंधित कोषागाराकडे सादर केली जातात या कारणांमुळे भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान सेवानिवृत्तीच्या दिवशी अदा करणे शक्य होत नाही, सेवानिवृत्ती प्रकरण / प्रस्ताव किमान सहा महिने अगोदर संबंधित

शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करण्याबाबत सर्व शाळा / महाविद्यालय यांना विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांनी वेळोवेळी सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाळा आणि अन्य शैक्षणिक संस्थामधील मुलांच्या सुरक्षिततेबाबत नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत

**(२) २३७९ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापुर येथील शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडल्यानंतर अशा घटनांना आळा घालण्यासाठी शाळा आणि अन्य शैक्षणिक संस्थामधील मुलांच्या सुरक्षिततेबाबत अहवाल सादर करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या दोन निवृत्त न्यायमूर्तींच्या समितीने माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू समितीने अहवालात सादर केलेल्या शिफारशीचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच, सदरहू अहवालातील कोणत्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत आणि त्यांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सर्व शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद आवश्यक असते शासनाने अशा किती शाळांना निधी उपलब्ध करून दिला आहे, तसेच सदर शिफारशीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या नियमांची अमंलबजावणी होते की नाही यांची पहाणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) बदलापूर, ता.अंबरनाथ येथील दुर्दैवी घटनेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून सु-मोटो जनहित याचिका क्र. १/२०२४ दाखल करुन घेण्यात आली. सदर सु-मोटो जनहित याचिकेच्या अनुषंगाने सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रके यांमधील सूचना व मा.सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेता, राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात एकत्रितरित्या सर्वसमावेशक सूचना दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या सूचना खालील मुद्दांच्या अनुषंगाने आहेत-
१. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ मधील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करणे.
२. शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणाऱ्या अत्याचाराची तक्रार POCSO e-Box व CHIRAG या ॲपवर करणे

३. राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये तक्रार पेटी बसविणे.
४. शाळांमध्ये सखी-सावित्रीचे गठन करण्याबाबतची कार्यवाही करणे.
५. शाळा व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे.
६. कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी नियुक्तीपूर्वी काटेकोरपणे करणे.
७. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसंदर्भातील सुरक्षिततेच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.
८. शाळेतील मुली व मुलांकरीता स्वतंत्र प्रसाधनगृह / स्वच्छतागृह असणे.
९. शाळेत येणाऱ्या अभ्यागतांसाठी आचारसंहिता लागू करणे.
१०. सायबर हल्ले व धोके टाळण्याच्या अनुषंगाने शाळा / पालकांनी कार्यवाही करणे.
११. क्षमता निर्माण आणि प्रशिक्षण यासंदर्भात कार्यवाही करणे.
१२. विद्यार्थी सुरक्षा समितीचे गठन करणे.
१३. जिल्हा स्तरावरील विद्यार्थी सुरक्षा आढावा समितीचे गठन व विभागीय स्तरावरील पर्यवेक्षण करणे.

(३) दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे, खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असेल. तसेच, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत, अशा शाळांनी प्राधान्याने कॅमेरे बसविण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. दिनांक १३ मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी किमान ५ टक्के निधी राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये ज्या योजनांसाठी हा निधी वापरण्यास मुभा आहे, त्याचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. यात पायाभूत सुविधांचे निर्माण या घटकाचा देखील समावेश आहे. त्यामुळे सदर राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के प्रमाणातील निधीचा वापर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी करण्यात येतो.

जिल्हास्तरावर उपलब्ध असणारे निधी जसे की, खनिज निधी, विधिमंडळ व संसद सदस्य निधी, जिल्हा परिषदेमधील विकास कामाचे विविध निधी, इ. निधी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरीता वापरता येऊ शकतात. अशा प्रकारचे विविध निधी जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व संबंधित अन्य अधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावेत.

केवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे पुरेसे नसून ठराविक अंतराने त्यांचे फुटेज देखील तपासणी आवश्यक असून, असे फुटेज तपासण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असेल. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशांनुसार, विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील सुरक्षा उपाययोजनांबाबतची माहिती अपलोड करण्यासाठी शाळांसाठी एक पोर्टल विकसित करण्यात आले आहे. हे पोर्टल https://education.maharashtra.gov.in/school/users/studentSecurityPublic या वेबलिंकद्वारे सर्व सामान्य नागरिकांसाठी खुले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांना सीसीटीव्हीसाठी निधी देण्याबाबत

**(३) २५४६ (१८-०७-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अरुण लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३३१ ला दिनांक २० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषत: मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वर्गखोल्या आणि शाळेच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधकारक करण्याचा निर्णय दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेतला असून सन २०२५-२६ हे शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी सर्व शाळा आश्रमशाळा व आंगणवाड्यामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याचे शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित विभागाकडून आदेश निर्गमित करण्यात आले असून सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV) बसविण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाला निर्देश दिल्याचे माहे मे-२०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल सु-मोटो जनहित याचिका क्र.०१/२०२४ च्या अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार, शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२४ अन्वये सेवानिवृत्त न्यायाधीश, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या समितीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजनांच्या शिफारशीचा सविस्तर अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्देशाची अंमलबजावणी करण्यासाठी दोन महिन्याची मुदत दिली असून सांगली जिल्ह्यातील या शाळांमध्ये कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीकडून ५ कोटी ३१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती प्राथमिक शिक्षणचे शिक्षणाधिकारी, यांनी दिलेली असली तरी जिल्ह्यातील जिल्हापरिषदेच्या प्राथमिक एक हजार ६८६ शाळांपैकी सर्वाधिक एक हजार २०८ शाळांमध्ये तर माध्यमिकच्या ७६४ शाळांपैकी २९६ शाळांमध्ये अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे बसविले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमध्ये निधीअभावी अद्याप सीसीटीव्ही लागलेले नाहीत तसेच एकूण किती शाळा, आश्रमशाळा व आंगणवाड्या असून आतापर्यंत किती शाळांमध्ये प्रत्यक्षात किती सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत तसेच सर्व शाळांमध्ये किती कालावधीमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणार आहेत,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्हीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही (CCTV)बसविण्याबाबत तसेच समितीने शासनास सादर केलेल्या अहवालात दिलेल्या शिफारशीनुसार महिला शिक्षिकांमार्फत समुपदेशन करण्याबाबतची जबाबदारी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच या कामास विलंब करण्याऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये-राज्यातील सर्व शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

तसेच, दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत सुचना दिलेल्या असून, त्यानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सांगली यांचेकडील दिनांक ०८/१०/२०२४ नुसार पुनर्विनियोजन आदेशान्वये निधी मंजूर करणेत आलेला आहे. तसेच, ७२९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटिव्ही बसवण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सन २०२५-२६ च्या जिल्हा स्विय निधी सुधारीत अंदाजपत्रकानुसार रुपये २ कोटी ५० लक्ष इतके अनुदान मंजूर असून ३६० शाळांमध्ये सीसीटिव्ही बसवण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) दिनांक १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत सुचना दिलेल्या असून, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

शाळांनी शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर नोंदविलेल्या माहितीनुसार राज्यातील १८,५७२ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आलेले असून उर्वरीत ४१,४९९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे लावलेले नाहीत. या शाळांना सीसीटिव्ही लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) शासन निर्णय, दिनांक १३ मे, २०२५ अन्वये, राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपायायोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत (प्रत संलग्न). सदर शासन निर्णयात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत : -

खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरीता शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील. सदर कॅमेरे नियमितपणे कार्यरत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असेल. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेली नाहीत अशा शाळांन कॅमेरे बसविण्याकरीता जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के निधीचा वापर करता येईल असे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरावर उपलब्ध असणारे निधी, जसे की, खनिज निधी, विधिमंडळ व संसद सदस्य निधी, जिल्हा परिषदेमधील विकास कामाचे विविध निधी, इत्यादी निधी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरीता वापरता येऊ शकतात. केवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे पुरेसे नसून ठराविक अंतराने त्यांचे फुटेज देखील तपासणी आवश्यक असून, असे फुटेज तपासण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

दिनांक १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे विद्यार्थी मानसिक दबावाला बळी पडु नये म्हणुन व्यवस्थापनाने शाळेत समुपदेशनाची व्यवस्था करावी. खाजगी स्वयंअर्थसहाययीत शाळांनी त्यांच्या शाळेमध्ये प्रशिक्षित, विहित अर्हताप्राप्त व अनुभवी समुपदेशकाची नियुक्ती करावी. शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व अनुदानित शाळा यांनी त्यांच्या शाळेतील एक शिक्षक समुपदेशक म्हणुन नियुक्त करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालास हमीभाव मिळत नसल्याबाबत

**(४) ४६९७ (२१-११-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने घोषित केलेल्या २६ शेतमालांपैकी ओला शेतमाल आल्यास शेतकऱ्यांना हमीभाव (एमएसपी) मिळत नाही, तर अनेक ठिकाणी ओलसर शेतमालाची खरेदी नाकारली जात असून सोयाबीन, तूर, मूग, ऊस या पिकांचा ओलसर शेतमाल मोठ्या प्रमाणावर येत असून शेतकऱ्यांना बाजारात योग्य दर मिळण्यास अडचणी येत आहेत, त्यामुळे त्यांच्या उत्पादनाला हमीभावापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार काही शासकीय खरेदी केंद्रांवर ओलसर शेतमाल घेण्यास नकार दिला जात असल्याने काही खाजगी व्यापारी याचा गैरफायदा घेऊन शेतकऱ्यांचा माल कमी दराने खरेदी करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा दर्जा तपासण्यासाठी आवश्यक सोयी-सुविधा, आधुनिक ड्रायिंग युनिट्स, तसेच शेतमाल खरेदी करताना पारदर्शकता राखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच शेतमाल खरेदीदरम्यान शेतकऱ्यांचे शोषण होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०८-१२-२०२५) :** (१) व (२) किमान आधारभूत योजनेंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मागर्दशक सूचनेनुसार हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्यात येते. सदर सूचनांनुसार एफएक्यु (फेअर एव्हरेज क्वालिटी) मानांकानुसार १२ टक्यांपर्यंत ओलावा असलेला शेतमाल स्विकारण्यात येतो. सद्य:स्थितीत राज्यात सोयाबीन, उडिद व मूग खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून हमीभाव खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल कमी दराने विक्री करावा लागू नये याकरीता नाफेड/एनसीसीएफमार्फत आतापर्यंत ५५७ खरेदी केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहे.
(३) हमीभाव योजनेंतर्गत खरेदी केंद्रांच्या निश्चितीकरीता शासन पत्र दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ नुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. त्यानुसार हमीभाव खरेदी करणाऱ्या संस्थेकडे आवश्यकतेनुसार सर्व साधनसामुग्री, मनुष्यबळ व इतर अनुषंगिक सोयीसुविधा उपलब्ध असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शेतमाल खरेदी दरम्यान पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने सर्व खरेदी केंद्रे व वखार महामंडळाच्या गोदामांवर नाफेड नियुक्त गुणनियंत्रकाची (सर्वेअरची) नेमणूक करण्यात आली आहे. तसेच हमीभाव खरेदी प्रक्रियादरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने तसेच खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये राज्यस्तरीय,जिल्हास्तरीय व तालुका स्तरीय दक्षता पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जुन्या कर्जाचे पुनर्गठन करुन नव्याने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) ४७०१ (२१-११-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील सुमारे ५८ हजार शेतकऱ्यांची कर्जखाते 'नॉन-परफॉर्मिंग असेट' (एनपीए) म्हणून घोषित करण्यात आले असून या शेतकऱ्यांकडून पूर्वीचे कर्ज वेळेवर न भरल्यामुळे किंवा सातबाऱ्यावर कर्ज थकबाकी दाखवली गेल्याने त्यांची पतशक्ती कमी झाली असून, परिणामी बँकांकडून नव्याने पीककर्ज वितरण थांबविण्यात आले असल्याने त्यांना पुढील पीककर्ज उपलब्ध न झाल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीविषयक पीककर्ज वितरणासाठी 'सिबिल स्कोअर' तपासू नये असा शासनाचा आदेश असतानाही काही बँकांनी सदर आदेशाचे उल्लंघन करून शेतकऱ्यांचा सिबिल स्कोअर तपासून, त्याआधारे शेतकऱ्यांना कर्ज नाकारत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यांतूनही एनपीए झालेल्या शेतकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या, बियाणे व खत खरेदी तसेच शेतीच्या एकूण अर्थकारणावर गंभीर परिणाम झाला असल्याने एनपीए झालेल्या शेतकऱ्यांनी जुन्या कर्जाचे हप्ते व व्याज भरून पुनर्गठन (री-स्ट्रक्चरिंग) योजना राबवण्याची मागणी शासनाकडे केली असून, शासनाने या संदर्भात अद्याप कोणतीही कार्यपध्दती अथवा मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एनपीए झालेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यासाठी शासनाने कोणती पुनर्गठन योजना (Debt Restructuring Scheme) राबवण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०८-१२-२०२५) :** (१) होय.

(२) नाही.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २८/०१/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये बँकांनी कर्ज मंजूर करताना संबंधित कर्जदाराकडून थकबाकी नसल्याचा दाखला (No Dues Certificate) घेण्याऐवजी संबंधित कर्जदाराची पत, परतफेड क्षमता व परतफेडीचा भुतकालीन व्यवहार इ. बाबी तपासण्यासाठी सिबिल अहवालाचा वापर करण्याबाबत सूचित केले आहे. सदर सुचनेनुसार बँकांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर करताना सिबिल स्कोअर विचारात न घेता, सिबिल अहवाल विचारात घेण्यात येतो.

राज्यातील शेतकऱ्यांना बँकांमार्फत शेती कर्जपुरवठा करतांना सिबील स्कोरचा आग्रह न धरण्याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सर्व बॅकांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बँकस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) नाही.

भारतीय रिझर्व्ह बँकेने अनुत्पादीत वर्गवारीतील कर्जखात्यांच्या वसुलीसाठी बँकांना दिनांक ०८/०६/२०२३ रोजीच्या परिपत्रकाव्दारे मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार बँक स्तरावर कार्यवाही करण्यात येते.

राज्यात नैसर्गिक आपत्ती घोषीत केल्यानंतर बँकांकडून शेतकऱ्यांच्या पीक कर्ज व मुदती शेती कर्जाचे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे पुनर्गठन करण्यात येते. यामध्ये अनुत्पादीत कर्जाच्या पुनर्गठनाचा समावेश नाही. तथापि, अनुत्पादीत कर्जाच्या परतफेडीसाठी बँकामार्फत एकरकमी परतफेड योजना तथा सामोपचार परतफेड योजनेमार्फत सवलत देण्यात येते.

शासन परिपत्रक दिनांक २६/११/२०२५ अन्वये सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती देण्याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई तसेच सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार शेती कर्जाच्या पुनर्गठनासाठी संबंधित शेतकऱ्यांनी संमती दिल्यास बँकांमार्फत कर्जाचे पुनर्गठन करण्यात येऊन शेतकऱ्यास नव्याने कर्ज पुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद आणि शासकीय शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा न झाल्याबाबत

**(६) ४७६६ (२१-११-२०२५) श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद आणि इतर शासकीय शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू होऊन ४ - ५ महिन्याचा कालावधी होवूनही विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा झाला नसल्याने इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात अडचण येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदिर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुस्तके वेळेवर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी असलेल्या ‘बालभारती’ (राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ) किंवा शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, तसेच शैक्षणिक सत्र सुरू होऊनही विद्यार्थ्यांना पुस्तके न मिळण्यामागे वितरण साखळीतील त्रुटी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) समग्र शिक्षा व पीएमश्री योजनेंतर्गत राज्यातील सर्व शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व शासन अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता १ ती ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तकांचा पुरवठा करण्यात येतो. जिल्हा परिषद व महानगरपालिका यांनी बालभारतीच्या ई-बालभारती पोर्टलवर नोंदविलेल्या ऑनलाईन मागण्यांना दिलेल्या अंतिम मान्यतेनुसार सन २०२५-२६ करीता पाठयपुस्तकांच्या ५,७१,२६,३३५ इतक्या प्रतींचा पुरवठा करण्यात आला आहे. इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी पाठयपुस्तक मंडळाने सर्व नियमित पाठयपुस्तके मंडळाच्या संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली आहेत.

तथापि, छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यांमध्ये १०० टक्के शाळांना पाठ्यपुस्तके न मिळाल्याबाबत राज्य प्रकल्प संचालक कार्यालयास तक्रार प्राप्त झाली असता शिक्षणाधिकारी(प्राथ.), छत्रपती संभाजीनगर, महानगरपालिका, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर व शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार कोणताही निकषपात्र विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय शाळांमध्ये पायाभूत सुविधां उपलब्ध करून देण्याबाबत

**(७) ४९२१ (२१-११-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके, श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक २७३७ ला दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांनी प्राधान्याने अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी माहे ऑगस्ट,२०२५ मध्ये विभागाला दिले असून समग्र शिक्षण अभियानाचा अर्थसंकल्प ठरविण्यासाठी राज्यासह केंद्र शसनाच्या शिक्षण विभागासोबत पार पडलेल्या संयुक्त बैठकीत युडायसच्या आकडेवारीनुसार राज्यातील जवळपास ८ हजार १२३ शाळांमध्ये पायाभूत सुविधा नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५३७३ शाळांमध्ये वीज, ५३० शाळांमध्ये पिण्याचे पाणी, ३३३५ शाळांमध्ये मुलींसाठी तर ५१२४ शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालय नसल्याचीदेखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोनापूर (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील शाळेचे छत उडून गेलेले असून त्याकडे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने या शाळेत शिक्षण घेणारे विद्यार्थी खुल्या जागेत शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच सोनापूर (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील शाळेची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) व (२) केंद्र शासन पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना मूलभूत सुविधांकरीता अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

सन २०२५-२६ च्या यु-डायस प्लस डाटा नुसार राज्यातील ६४,५५६ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांपैकी ५९९,९१९ इतक्या शाळांमध्ये वीज, ६३,७६८ शाळांपैकी ५९,८१६ शाळांमध्ये मुलांचे स्वच्छतागृह, ६३,९११ शाळांपैकी ६१,३९७ शाळांमध्ये मुलींचे स्वच्छतागृह व ६४,५२६ शाळांपैकी ६४,१७७ शाळांमध्ये पिण्याचे पाणी अशा सुविधा उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत काही कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०२५-२६ मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत १७२० शाळांमध्ये मुलांचे स्वच्छतागृह, ११५५ शाळांमध्ये मुलींचे स्वच्छतागृह उपल्ब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे समग्र शिक्षा अंतर्गत मंजूर झालेल्या २३ मुलींचे व २४ मूलांचे स्वच्छतागृहांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच, सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत एकूण ८४ शाळांना दुरुस्तीची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सोनापूर ता.सावली जि.चंद्रपूर येथील शाळेचे जुन्या इमारतीचे माहे जून २०२५ मध्ये वादळी पावसाने उडालेले छत निर्लेखित करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून मंजुरी करीता सादर करण्यात आलेले आहे. तसेच शाळेमध्ये ३ वर्गखोल्या उपलब्ध असून सन २०२४-२५ मध्ये खनिज विकास निधी अंतर्गत १ वर्गखोलीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २ वर्गखोल्यांचे बांधकाम रुपये ४०.०० लक्ष इतक्या रक्कमेचे मंजूर झालेले असून निविदा प्रक्रियेमध्ये आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे कर्जबाजारी झालेल्या व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(८) ४९५८ (२१-११-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक भागांत झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे लाखो हेक्टरवरील पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर,२०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभाग व सोलापूर जिल्ह्यातील पूरस्थिती अत्यंत गंभीर असून, शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने जाहीर केलेली मदतीची रक्कम अत्यंत अपुरी आणि तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ‘ओला दुष्काळ’ जाहीर करून कर्जबाजारी व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट कर्जमाफी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०९-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

शासनाने बाधित शेतकऱ्यांना शेतीपीकाच्या नुकसानीपोटी, शेतजमीनीचे नुकसानीपोटी तसेच बियाणे व इतर अनुषंगिक बाबीकरता रुपये १४०२१.७४ कोटी इतकी मदत मंजूर केली आहे.

(४) राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक ३०/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील विशेषतः हिंगोली जिल्ह्यातील शाळांमध्ये महिला शिक्षकांची नियुक्ती करणेबाबत

**(९) ४९९७ (२१-११-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) येथील मुलींना शाळेत शिक्षण घेताना विविध वैयक्तिक समस्या असून शाळांमध्ये महिला शिक्षकांची उपस्थिती अत्यावश्यक असतानाही उक्त जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १०० ते १५० शाळांमध्ये महिला शिक्षिका नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित शाळांमध्येही एक किंवा दोन महिला शिक्षिकांची नियुक्ती असते मात्र शाळांमध्ये मुलींना समुपदेशन आणि मानसिक आधार मिळावा यासाठी प्रत्येक शाळेमध्ये महिला शिक्षकांची नियुक्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-१२-२०२५) :** (१) व (२) कळमनुरी तालुक्यातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या १९७ शाळांपैकी ८७ शाळांमध्ये महिला शिक्षक कार्यरत नाहीत.

स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती ही पवित्र पोर्टलमार्फत होत असते. त्यासाठी महिलांसाठी ३० टक्के समांतर आरक्षण लागू आहे. प्राप्त गुणांनुसार व उमेदवारांनी दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार त्यांना पदस्थापना दिली जाते. शाळेतील मुलींची संख्या हा निकष यासाठी विचारात घेतला जात नाही.

ज्या शाळांमध्ये महिला शिक्षक कार्यरत नाहीत अशा शाळांमधील मुलींना भेडसावणाऱ्या समस्यांच्या अनुषंगाने नजिकच्या शाळेतील महिला शिक्षकांनी त्यांना किमान महिन्यातून एक दिवस समुपदेशन करावे अशा आशयाच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्याबाबत ग्रामविकास विभागास अवगत करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी माहिती अद्ययावत केली नसल्याबाबत

**(१०) ५०११ (२१-११-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांपैकी १४१ महाविद्यालयांनी आपली माहिती विद्यापीठाशी नियमित अद्ययावत केलेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयांची विद्यापीठाने तपासणी केली असता त्यापैकी ३९ महाविद्यालये प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणांची गंभीर दखल घेऊन या महाविद्यालयांच्या व्यवस्थापन मंडळावर कायद्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०५-१२-२०२५) :** (१), (२) व (३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनामार्फत केलेल्या पडताळणी दरम्यान विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांपैकी एकूण ११४ महाविद्यालये /परिसंस्थांनी संलग्नीकरणाच्या मान्यतेच्या नूतनीकरणाची मागील पाच वर्षांपासून प्रक्रिया केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर महाविद्यालयांमध्ये / परिसंस्था यामध्ये खालील कारणांमुळे विद्यार्थी देखील प्रवेशित नाहीत.

(अ) काही महाविद्यालये / परिसंस्था ह्या अभिमत/खाजगी विद्यापीठात परावर्तीत झाल्यामुळे.

(ब) काही महाविद्यालये/ परिसंस्थांनी शिखर संस्थेची मान्यता प्राप्त न केल्यामुळे.

(क) काही महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी महाविद्यालय बंद करणेबाबत अर्ज सादर केल्यामुळे. नूतनीकरणाची प्रक्रिया केलेली नसलेल्या ११४ महाविद्यालयांपैकी ३८ महाविद्यालयांचे / परिसंस्थांची (३७ महाविद्यालये व १ संशोधन केंद्र) पडताळणी विद्यापीठामार्फत पूर्ण झाली असून या महाविद्यालये/परिसंस्थांमध्ये कोणतेही विद्यार्थी प्रवेशित नाहीत. सदर ३८ महाविद्यालये/परिसंस्था यांना विद्यापीठाचे संलग्नीकरण/मान्यता नसल्याची बाब महाविद्यालय/ परिसंस्था यांच्या यादीसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उर्वरित ७६ महाविद्यालयांची पडताळणी सुरू असून पडताळणीअंती त्यांवर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शालेय विद्यार्थ्यांकरीता तांदूळ पुरविणाऱ्या संस्थेने गैरव्यवहार केल्याबाबत

**(११) ५०२० (२१-११-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शासकीय तांदुळाचा पुरवठा करण्याचे कंत्राट दिलेल्या जे.वी.ग्रेन्स स्टोअर्स या नोंदणीकृत सामाजिक संस्थेमार्फत तांदुळ शालेय विद्यार्थ्यांना उपलब्ध न होता त्याची थेट परदेशात विशेषतः आफ्रिकन देशात तस्करी होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, जे.वी.ग्रेन्स डीलर्स या नोंदणीकृत सामाजिक संस्थेमार्फत झालेल्या तांदुळ तस्करी गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी होऊन आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत माहे जून, २०२५ ते मे, २०२७ या कालावधीसाठी मुंबई जिल्ह्यातील योजनेस पात्र असणाऱ्या सर्व शाळांना आवश्यक तांदूळ भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून उचलून शाळा / केंद्रिय स्वयंपाकगृह स्तरावर वितरीत करणेसाठी श्री.जे. बी. ग्रेन डिलर्स असोसिएशन या वाहतूकदार संस्थेची ई-निविदा प्रक्रियेव्दारे निवड करण्यात आली असून सदर संस्थेस कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर वाहतूकदार संस्थेस माहे जून, २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीसाठी ५,७८७.९३२ मे. टन तांदूळ वितरीत करण्याचे आदेश देण्यात आले असून संपूर्ण तांदूळ केंद्रिय स्वयंपाकगृहस्तरावर संस्थेमार्फत वाटप करण्यात आलेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कराड (जि.सातारा) येथील यशवंत सहकारी बॅंकेत ११२ कोटी रुपयांचा अपहार झाल्याबाबत

**(१२) ५०३२ (२१-११-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) येथील यशवंत को-ऑप. बॅंकेत ११२ कोटी १० लाख ५७ हजार ४८१ रुपयांचा अपहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाच्या सूचनेनुसार सदर बॅंकेचे वैधानिक लेखापरिक्षण केले असता दिनांक ९ ऑगस्ट, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०२५ या कालावधीत बॅंकेच्या आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी बॅंकेचे चेअरमन, संचालक, अधिकारी व इतर असे ५० जणांविरुध्द कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने उक्त बँकेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (०५-१२-२०२५) :** (१) व (२) यशवंत को.ऑप. बँक लि. कराड, जि.सातारा या बँकेचे दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२५ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण में. देशपांडे आणि मेंडीस, सनदी लेखापाल, पुणे यांनी केले आहे. लेखापरीक्षणा दरम्यान रुपये ११२,१०,५७,४८१/- (अक्षरी रुपये एकशे बारा कोटी दहा लाख सत्तावन्न हजार चारशे एक्याऐंशी फक्त) इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) सहकार आयुक्त यांचेकडून दिनांक ०३/१०/२०२५ च्या पत्रान्वये प्राधिकृत केल्यानुसार बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी दिनांक ११/१०/२०२५ रोजी कराड शहर पोलीस स्टेशन, कराड येथे दिनांक ११/१०/२०२५ रोजी प्रथम खबरी अहवाल (FIR) क्रमांक ११६८नुसार बँकेचे चेअरमन, संचालक, अधिकारी व इतर असे ५० जणांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.
(४) सहकार आयुक्त कार्यालयाच्या दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ (१) नुसार उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.कराड जि.सातारा यांना आर्थिक नुकसानीची रक्कम निश्चित करणे, नुकसानीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींच्या जबाबदारीचे प्रमाण निश्चित करुन, त्यांचेकडून आर्थिक नुकसानीची रक्कम वसुल करणे यासाठी नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार पुढील चौकशी कामकाज चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये पोषण आहार व समग्र शिक्षा अभियानाच्या अनुदान वितरणातील विलंबाबाबत

**(१३) ५०६० (१७-१२-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पोषण आहारांतर्गत खिचडी देण्यासाठी देण्यात येणारे प्रति विद्यार्थी माहे मार्च ते ऑगस्ट, २०२५ या कालावधीतील अनुदान अद्याप देण्यात आले नाही तसेच समग्र शिक्षा अभियानाचे अनुदानदेखील त्यांना प्राप्त झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोषण आहार अनुदान आणि समग्र शिक्षा अभियानाचे अनुदान देण्याबाबत मुख्याध्यापकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे वारंवार लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनुदान वेळेवर शाळांना न देण्याची कारणे काय आहेत, तसेच, यामुळे विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याने शासनाने वेळेवर अनुदान देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाकडून दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजी राज्यास पहिल्या हप्त्याचे अनुदान प्राप्त झाले होते. केंद्र व राज्य हिस्सा अनुदान दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त

(शिक्षण), पुणे यांना वितरीत करण्यात आले असून सदर निधी कोषागार कार्यालयातून दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आहरित करण्यात आला व दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व जिल्ह्यांना निधी पीएफएमएस प्रणालीद्वारे खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच, केंद्र शासनाकडून दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ रोजी राज्यास दुसऱ्या हप्त्याचे अनुदान प्राप्त झाले होते. केंद्र व राज्य हिस्सा अनुदान दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण), पुणे यांना वितरीत करण्यात आले आहे.

समग्र शिक्षांतर्गत केंद्र शासनाकडून पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त झालेला असून यामधून मोफत गणवेश व इतर महत्त्वाच्या उपक्रमांकरीता निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत

**(१४) ५०६४ (२१-११-२०२५) श्री.संजय खोडके, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे सादरीकरण सहयाद्री अतिथीगृह (मुंबई) येथे मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्या उपस्थित करण्यात आले असून सदर नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील पाणीटंचाई दूर होऊन शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक ८ सप्टेंबर,२०२५ रोजी राज्य शासनाला दिलेल्या निर्देशानुसार वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ शासनाकडे सादर करण्यात आला असून त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला गती देण्यासाठी कालबध्द नियोजन करुन प्रकल्पासाठीच्या निधीचे राज्य शसनाने कशा प्रकारे आर्थिक नियोजन केले आहे, तसेच केंद्र शासनाकडून किमान २५ टक्के निधी मिळण्याकरीता राज्य शासनाने केंद्र शासनास पत्र व्यवहार केला असून सदर निधी उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा विभागाने सादर केलेल्या सविस्तर अहवालात (डीपीआर) केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०३-१२-२०२५) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ६२.५७ टीएमसी पाणी उपलब्ध असून त्याद्वारे भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यातील सिंचन व घरगुती वापरा करीता नियोजन प्रस्तावित आहे.

मराठवाड्यातील क्षेत्रास पाणी देण्याचे दृष्टीने तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता याचा अभ्यास प्रगतीपथावर असून, सदर अभ्यासाअंती या क्षेत्राकरीता आवश्यक पाणी गरज व उपलब्ध पाण्याचा ताळेबंद करूनच वाढीव क्षेत्राचा वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामधील समावेश निश्चित करणे शक्य

होईल.
(२) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांचेकडे तपासणीसाठी सादर असून, राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे तपासणीतंर्गत आहे.
(३) होय.
मा.पंतप्रधान महोदयांना मा.मुख्यमंत्री महोदयांनी त्यांचे दिनांक १०/१०/२०२५ च्या पत्रान्वये ६०% निधी मिळणेबाबत विनंती केली आहे. सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरीनंतर केंद्रीय जल आयोगाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
(४) वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून राज्य तांत्रिक सल्लागार समिती अमरावती-३ यांचे कडे सादर असून त्यावरील शेरे पुर्तता सुरु आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अंती राज्य शासनास सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मान्यतेसाठी सादर होईल. सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरी नंतर पुढील १० वर्षात प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे बोरगांव (खु.) (ता.पालम, जि.परभणी) अंतर्गत बैंडकी तांडा येथील विद्यार्थ्यांकरिता नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत

**(१५) ५०९८ (२१-११-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बोरगांव (खु.) (ता.पालम, जि.परभणी) अंतर्गत बेंडकी तांडा येथील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्यावतीने नवीन प्राथमिक शाळा विशेष बाब म्हणून मंजूर करावी या मागणीसाठी तांड्यावरील विद्यार्थ्यांसह संतप्त ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवर माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेंडकी तांड्याची लोकसंख्या ७०० पेक्षा जास्त असून तेथे १५० कुटुंब असून बालवाडी ते ७ वी पर्यंत ४५ ते ५० विद्यार्थी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावांतर्गत तांड्यावरुन जवळच्या शाळेत जाण्यास ओढया-नाल्यामुळे व नैसर्गिक अडथळे येत असल्याने तसेच तांड्यापासून शाळेचे अंतर एक किलोमीटर पेक्षा जास्त असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाणे अशक्य होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नव्या शैक्षणिक धोरणानुसार एक किलोमीटरच्या आत प्राथमिक शाळा उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण असून त्या धोरणाची अंमलबजावणी करुन ग्रामस्थांच्या मागणीनुसार मौजे बोरगांव (खु.) (ता.पालम, जि.परभणी) अंतर्गत बेंडकी तांडा येथे प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.दादाजी भुसे (०७-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशतः खरे आहे.

ग्रुप ग्रामपंचायत बोरगांव बु. ता.पालम अंतर्गत बेंडकी तांडा व सोनेरी तांडा हे दोन तांडे असून सोनेरी तांडा येथे सन २००८ पासून प्राथमिक शाळा (इ.१ ली ते इ.४ थी) सुरू आहे. बेंडकी तांडा व सोनेरी तांडा यामधील अंतर ६२० मीटर आहे.

बेंडकी तांडा येथील १७ विद्यार्थी शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पर्यंत जि.प.प्राथमिक शाळा, सोनरी तांडा येथे शिक्षण घेत होते. परंतु, शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये सोनेरी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत प्रवेश न घेता, १२ विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोथी तांडा, ता.गंगाखेड येथे प्रवेश घेतला असून उर्वरित विद्यार्थ्यांनी त्याच परिसरातील अन्य शाळांमध्ये प्रवेश घेतलेला आहे.

(४) व (५) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार १ कि.मी. च्या आत प्राथमिक शाळा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.

बेंडकी तांडा ते सोनेरी तांडा यामधील अंतर ६२० मीटर असून, सोनेरी तांडा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपलब्ध आहे.

---

## राज्यातील ८९ फार्मसी महाविद्यालयांची मान्यता रद्द केल्याबाबत

**(१६) ५१६२ (१३-११-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य तंत्र शिक्षण मंडळ आणि तंत्र शिक्षण संचालनालयाने केलेल्या तपासणीत फार्मसी महाविद्यालयांनी वारंवार नियमांचे उल्लंघन केल्यामुळे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या शिफारशीनुसार राज्यातील ७१ डी फार्मसीची व १८ बी फार्मसीची अशी एकूण ८९ फार्मसी महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या फार्मसी महाविद्यालयाने कोणकोणत्या नियमांचे उल्लंघन केले असल्याचे तपासणीत निदर्शनास आले आहे, तसेच मान्यता रद्द केलेल्या फार्मसी महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्षांच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना सहभागी करण्यास बंदी घातली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये तसेंच फार्मसी विद्यार्थीची गरज लक्षांत घेतां ही महाविद्यालये तात्काळ सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०१-१२-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ मध्ये मान्यता देण्यात आलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदविका, पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने, सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि पदवी संस्थांची, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया ने निर्धारित केल्यानुसार शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे, यासंदर्भात अनुक्रमे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ आणि तंत्र शिक्षण संचालनालय यांच्यामार्फत फेरतपासणी करण्यात आली.

याबाबत, दिनांक २९/०७/२०२५ रोजी शासनस्तरावर बैठक होऊन, त्रुटी असलेल्या संस्थांकडून खुलासा घेण्याचे निर्देश देण्यात आले. नोटीस बजावण्यात आलेल्या संस्थापैकी खुलासा समाधानकारक नसलेल्या पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या अनुक्रमे ७१ व १८ संस्थांची नावे फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांना

दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आली. सदर पत्रास अनुसरून, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या अनुक्रमे ७१ व १८ संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रथम वर्ष प्रवेश करण्यात येऊ नये, असे दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले.

तदनंतर काही संस्थांनी विभागाकडे पुनर्पडताळणीसाठी निवेदने सादर केली असता, पुनर्पडताळणीअंती ४२ संस्थांनी (३४ पदविका व ८ पदवी अभ्यासक्रम) त्रुटींची पूर्तता केल्याने सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यात आले. दरम्यानच्या कालावधीत उपरोक्त नमुद काही पदविका व पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केल्या होत्या. सदर न्यायालयीन प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक १३/१०/२०२५ रोजीचे आदेश विचारात घेऊन, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये यापूर्वीच्या त्यांच्या दिनांक २६/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये १८ पदवी व ७१ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थामध्ये प्रवेश न करण्याचे आदेश मागे घेऊन, सदर संस्थांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याबाबत कळविले. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदविका तसेच पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संपन्न झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजना राबविणेबाबत

**(१७) ५१६४ (२१-११-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न समितीच्या आवारात शेतकऱ्यांना मुक्कामाची सोय आणि मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस दोन वर्षांपासून मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर,२०२५ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनाची दुरुस्ती करण्यासाठी व नवीन ११६ बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन बांधण्यासाठी १३२.४८ कोटी रुपये निधीस मान्यता देण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी भवनाच्या दुरुस्तीची व नवीन शेतकरी भवन बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १९/१२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस शासन निर्णय दिनांक ८/१०/२०२५ अन्वये सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन आर्थिक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेंतर्गत नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी रुपये १०३.९८ कोटी व अस्तित्वातील शेतकरी भवनाच्या दुरुस्तीसाठी रुपये २८.५० कोटी

याप्रमाणे एकूण १३२.४८ कोटी इतक्या निधीच्या प्रस्तावास दिनांक १९/१२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) शेतकरी भवन योजनेअंतर्गत पणन संचालनालयाकडून प्राप्त एकूण ९५ प्रस्तावांपैकी परिपूर्ण ६८ प्रस्तावांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या 'अपार' प्रणालीतील अडचणींबाबत

**(१८) ५१६९ (२४-११-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाशी निगडीत अपार आयडी तयार करण्याचे दिनांक ०१ सप्टेंबर,२०२५ रोजी वा त्यासुमारास शाळांना निर्देश दिले असूनही विविध अडचणींमुळे सुमारे १ लाख १९ हजार विद्यार्थ्यांचे 'अपार' (Academic Performance and Assessment Record) आयडी निर्माण न झाल्याने विद्यार्थी पुढील शैक्षणिक प्रक्रियेपासून वंचित राहिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, 'अपार' आयडी न मिळाल्याने या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यात अडचण येत असल्यामुळे शैक्षणिक कागदपत्रांची नोंदणी थांबणे, तसेच प्रवेश प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागाच्या तांत्रिक अडचणी, मोबाइल नंबर बदलणे, शाळांकडून माहिती अद्ययावत न करणे यांसारख्या कारणांमुळे विद्यार्थी अडचणीत आले असून, याचा परिणाम गरीब व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अधिक झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शाळांनी दिलेले बोनाफाईड प्रमाणपत्र शासनाने मान्य करावे असे शिक्षक व मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे तसेच सर्व विद्यार्थ्यांना त्वरित 'अपार आयडी' मिळावा, शिष्यवृत्ती वेळेवर वितरित व्हावी आणि भविष्यात अशा प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही / उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०८-१२-२०२५) :** (१) दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ रोजीच्या यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार १,०८,४८३ विद्यार्थ्यांचे अपार आयडी विविध अडचणींमुळे अद्ययावत झाले नाहीत. तथापि, यामुळे विद्यार्थी कोणत्याही शैक्षणिक प्रक्रीयेपासून वंचित राहीलेले नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) यू-डायस प्लस प्रणालीमध्ये ज्या विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याची कार्यवाही अपूर्ण राहीली आहे, अशा विद्यार्थ्यांकरीता तांत्रिक अडचण / मोबाईल नंबर / नाव / जन्म तारीख आधार कार्ड प्रमाणे अद्ययावत करण्यासाठी यु-डायस प्लस प्रणालीमध्ये मुख्याध्यापकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(४) विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले नाही किंवा दुरूस्ती करावयाचे आहे, त्याकरीता शासन स्तरावरून

दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रानुसार पोस्ट ऑफिस कार्यालयामार्फत आधार मशिन व ऑपरेटर प्रत्येक तालुक्यामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे. "अपार आयडी अद्ययावत नाही" या कारणास्तव कोणत्याही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भ व मराठवाड्यातील हळद वायदे बाजारावर बंदी घालण्याची मागणी होत असल्याबाबत

**(१९) ५२१९ (२१-११-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.शिवाजीराव गर्जे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी हळदीच्या पिकातून मोठ्या प्रमाणात हळद उत्पादित करीत असून काही व्यापारी नफा मिळविण्यासाठी वायदे बाजाराचा गैरवापर करत असल्याने शेतकरी आणि व्यापारी व निर्यातदारांचे तसेच शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने विदर्भातील हळद वायदे बाजारावर बंदी घालण्याची मागणी काही व्यापारी संघटनाकडून केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालाचे अंदाज बांधण्यासाठी शेतकऱ्यांना वायदे बाजार मदत करते, त्यामुळे वायदे बाजारावर बंदी घालण्याऐवजी गैरवापर थांबविण्यासाठी कडक नियोजनाची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वायदे बाजारातील गैरवापर थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच हळद वायदे बाजाराचा गैरवापर करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (०४-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या थकीत अनुदानाबाबत

**(२०) ५८११ (१७-१२-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी असलेली "प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचे (मध्यान्ह भोजन) अनुदान मागील चार महिन्यापासून थकीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत जून, २०२५ महिन्यापासून निधी न मिळाल्याने मुख्याध्यापकांना स्वखर्चातून योजना राबवावी लागत आहे त्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने निर्णय घेवून या योजनेतील थकीत निधी तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) केंद्र शासनाकडून दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजी राज्यास अनुदान प्राप्त झाले होते. केंद्र व राज्य हिस्सा अनुदान दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण), पुणे यांना वितरीत करण्यात आले असून सदर निधी कोषागार कार्यालयातून दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आहरित करण्यात आला व दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सर्व जिल्ह्यांना निधी पीएफएमएस प्रणालीद्वारे खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.